## महिन्याचा विचार

## विराट पूजा

आमच्या भक्तीच्या कोणत्याही कृतीला गुरूदेवांनी कधीच पूजेच्या खोलीमध्ये सीमित केले नाही. समाधी स्थानावरील पूजाअर्चा नक्कीच प्रशिक्षणाचा पहिला टप्पा असे. मात्र गुरूदेव सतत आमच्या मनात ठसवत होते की, अवघं विश्व हेच विश्व–वृंदावन असते आणि तेथील प्रत्येक व्यक्ती स्वत: वासुदेव भगवान असते – ''वासुदेव: सर्वम इति''
विविध मार्गांनी गुरूदेव परमात्म्याच्या वैश्विक अस्तित्वाची पूजा करीत असत. नारायण भावाने एखाद्या रूग्णाची सेवा करताना गुरूदेव कसे त्या सेवेला परमात्म्याची मानून करीत असत हे आम्ही पाहिलेलं आहे. आश्रमात गुरूपौर्णिमेच्या दिवशी आणि वर्षातील इतर पवित्र दिवशी गुरूदेव स्वत:जवळ बरीच फुले तयार ठेवीत. जसजसे साधक त्यांच्या खोलीत अथवा कार्यालयात येत तसतसे ते सर्वप्रथम या साधकांची पण साधी पूजा करीत. जेव्हा एखादा कर्मठ साधक पाद्यपूजा करीत असे तेव्हा पूजा झाल्यावर गुरूदेव हातात फुले घेऊन हिंडत आणि पूजेत सहभागी झालेल्या सर्व साधकांचे पूजन करीत.

ज्यांना गुरूदेवांच्या चेहऱ्यावरील भाव सूक्ष्मपणे निरखायची संधी मिळत असे त्यांनाच त्यांच्या नजरेतील प्रत्येक साधकाला ईश्वराचे रूप मानण्याचे विचार ध्यानी येत असत. डामडौलाला त्यांच्या लेखी काही महत्व नसे. भक्ती हा हृदयाचा अविष्कार असतो आणि कोठल्याही दिखाऊपणाचे अनावश्यक प्रदर्शन म्हणजे त्यांच्या लेखी खऱ्या भक्तीचा तेथे अभाव असे. एक प्रसंग चांगलाच लक्षात राहिला आहे. विश्वनाथ मंदिरात आम्ही शिवरात्रीला चार–प्रहर पूजा केली होती. व्हरांड्यात गुरूदेवांचे ''ओम नम: शिवाय'' हे



मंत्र पठण अव्याहत सुरू होते. सर्वात शेवटचे पूजन झाल्यावर गाभाऱ्यात साधक बेलपान शिवलिंगावर ठेवीत होते. मी बघत होतो. क्वचित एखाद्या चेहेऱ्यावर खरी श्रद्धा दिसत होती. काहीजण बेलपत्रे शिवलिंगावर फेकत होते, काहींची बेलपत्रे खाली पडत होती. फार थोड्या साधकांनी मन लावून भक्तिभावाने पूजन केलेले होते.

जणू बऱ्याच जणांसाठी शिवलिंग हा केवळ पत्थराचा तुकडा मात्र होता आणि ते भगवंताचे प्रतिक होते. अखेरीस गुरूदेव बेलपत्रे घेऊन आले. त्यांचा तेज:पुंज चेहरा एका अनाम प्रकाशाने तेजाळला होता. काही बेलपत्रे त्यांनी नंदीला वाहिली. जणू भगवंताची पूजा करण्याची अनुज्ञा नंदीकडे मागितली. शिवाच्या पिंडीवर बेलाची पाने वाहण्यापूर्वी त्यांनी ना प्रार्थना केली ना भगवंताचे नामस्मरण केले. त्यांची नजर शिवलिंगाशी संवाद साधत होती. खूप दिवसांनी भेटल्यावर मित्राच्या चेहेऱ्यावर कसे भाव असतात? अगदी तशीच अभिव्यक्ती गुरूदेवांच्या चेहेऱ्यावर विलसात होती. इतक्या हळूवारपणे ते बेलाचे पाने वाहत होते की, एखाद्या नाजूक पानानेही पिंडीला इजा होऊ नये.

याहून अधिक मोठे दृश्य आमची वाट पाहात होते. नजरेच्या उघडझापीलाही कदाचित जास्त वेळ लागत असेल, इतक्या कमी वेळेत मागे वळून त्यांनी हातातील बेलपत्रे तेथे उपस्थित असलेल्या साधकांच्या अंगावर उधळली. गुरूदेवांनी त्यांची पूजा केली. सर्वांमधील ईश्वराला त्यांनी नमन केले. या पूजेचे वैशिष्ट्य असे की, ती निरिच्छपणे, कोणाच्याही ध्यानी न येता करावी अन्यथा ते पोकळ प्रदर्शन ठरते.
नवरात्रातील कन्यापूजन किंवा गांधीजयंतीला होणारे हरिजनांचे पूजन व्हावे तशा थाटात आश्रमातील विशिष्ट पूजा व्हाव्यात असा गुरूदेवांचा आग्रह असे.(क्रमश:)



### दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत –

१) नोव्हेंबर महिन्याचा सत्संग २६ तारखेला आणि डिसेंबर महिन्याचा सत्संग २४ तारखेला झाला.

२) ''दिव्य जीवन'' या मासिक पत्रिकेचा हा नोव्हेंबर–डिसेंबर जोड अंक आहे, तो शाखेच्या सदस्यांना ग्रुप वर, मेलने तसेच पोस्टाने पाठविण्यात आला.

३) १६ ऑक्टोबर रोजी आपल्या मुख्यालयाने आवाहन केल्याप्रमाणे आपल्या पुणे शाखेच्या वतीने अन्नदान करण्यात आले. पुणे येथील स्वामी समर्थ मंदिरात यासाठी आपल्या शाखेचे सदस्य गेले होते आणि नंतरही महिनाभर अन्नदान व्हावे म्हणून आपण शिध्याची व्यवस्था मंदिराच्या व्यवस्थापनाकडे केलेली होती.

४) स्वामी शिवानंद सरस्वती यांचे शिष्य स्वामी सत्यानंद सरस्वती यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या सांगतेनिमित्त वाशी येथे ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर ''सत्यम शताब्दी योग याग पूर्णाहूती''चे आयोजन स्वामी योगप्रताप यांनी केलेले होते. आपल्या शाखेचे सदस्य डिसेंबर २ आणि ३ रोजी यासाठी गेलेले होते.

**CONCERNING MIRACULOUS OCCURRENCES**
**(Sri Swami Omkarananda)**

Who is this Sivananda, on the banks of the Ganga, in the heart of the foothills of the Himalayas, whose ‘voice’ is heard by a few continental European devotees in Germany and Denmark day after day? This Sage, in whom the divine nature is so fully manifest and active, this Sivananda who has been granting sights of his physical form, at the same time to two persons—one in the isle of Ceylon and the other in Santiago, South America—who is he? Shakespeare asks us to “consider him well” (King Lear).

Who is this Sivananda, who, while not moving a furlong away from amidst us is reported to have literally stood by the sick patients in a Durban hospital? This Sivananda, whose packets of ashes sent by post all over the world, as Prasad of Lord Visvanath in the temple of the Ashram, have not only been curing the headaches of the housewives in the city of Bombay, acting as laxative to chronic constipation patients in Singapore, but proved to have breathed a new vigorous life into the dying bones of men in South India—who is he? This Godhead redeemer, this Sivananda, who makes his presence palpably felt by a devotee in Geneva and chats with another in Kuala Lumpur—who is he? Shakespeare answers: “The Thing Itself” (King Lear), and by this he means the higher liberated consciousness in all its bareness.



५) परमपूज्य माता मालतीदेवी यांच्याही जन्मशताब्दी सोहळ्याची सांगता दि.१७-१९ दरम्यान मिरज येथील तपोवनात झाली. त्यानिमित्त विष्णुयागाचे आयोजन करण्यात आलेले होते. आपल्या शाखेच्या वतीने काही सदस्य याही सोहोळ्याला उपस्थित होते.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
‘ईशावास्य’ प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के.
विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



पुणे शाखा
वर्ष १८/अंक ११-१२
नोव्हेंबर-डिसेंबर २०२३

## स्वामीजींचा दीपावली संदेश

**May you all attain full inner illumination! May the supreme light of lights enlighten your understanding! May you all attain the inexhaustible spiritual wealth of the Self! May you all prosper gloriously on the material as well as spiritual planes!**

(‘‘दिव्य-जीवन’’मासिक पत्रिकेच्या पुढील अंक जानेवारी २०२४ मध्ये प्रकाशित होईल.)